# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५
## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **सर्वश्री अभिजीत पाटील, नारायण पाटील वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"माढा (जि. सोलापूर) तालुक्यातील सीना माढा सिंचन योजना २००४ साली कार्यान्वीत होणे, सदर योजनेतील कन्हेरगाव, दहिवली, निमगाव टे., वरवडे, सापटणे टे., चिंचोली, अरण, भेंड, भुताष्टे, कुर्डु, लवूळ यासह इतर गावातील शेतकऱ्यांच्या जमीनी भूसंपादन करणे, भूसंपादीत केलेल्या जमीनींचा मोबदला देण्यासाठी ३५ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर असून यापैकी २१ कोटी रुपये निधीची मागणी कृष्णा खोरे विकास महामंडळाने शासनाकडे केलेली असणे, तसेच सदर योजनेंतर्गत १६ हजार हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार असून त्यापैकी १४ हजार हेक्टर क्षेत्र सध्या ओलिताखाली आलेले असणे, परंतु बावी, तुळशी, कुर्डू, परितेवाडी, पिंपळखुंटे, अंबाड, अंजनगाव, खेलोवा ही गावे या योजनेपासून वंचित असणे, सदर सिंचन योजनेच्या तृतीय सुप्रमाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनीही मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, तथापि अद्याप तृतीय सुप्रमाला मंजूरी देण्यात आलेली नसणे, शासनाने सीना माढा सिंचन योजनेच्या तृतीय सुप्रमाच्या उक्त प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक २ ते ५)**

(२) **श्री. हेमंत रासने, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनामार्फत २०२३ मध्ये विविध शासकीय विभागांमध्ये लिपिक व टंकलेखक या पदासाठी लेखी परिक्षा व कौशल्य चाचणी होऊनही अद्यापही निकाल जाहिर करण्यात न येणे, सदर निकाल जाहिर करण्यास शासनाने ठरवलेली निश्चित कालमर्यादा नसल्याने होणा-या विलंबामुळे उमेदवारांना मानसिक व आर्थिक ताणाला सामोरे जावे लागणे,

परिणामी उमेदवारांमध्ये तसेच त्यांच्या कुटुंबियांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने सदर परिक्षेचा निकाल जाहिर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(३) श्री. राजन नाईक, ॲड. पराग अळवणी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. सेल्वन, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"वसई- विरार महानगरपालिका क्षेत्रात उभारण्यात आलेल्या इमारतींमधील अनेक इमारतींचे विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त केले नसल्याची बाब निदर्शनास येणे, सदरहू भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या इमारतींना महानगरपालिका तसेच इतर शासकीय प्राधिकरणांमार्फत नागरी सुविधा मिळण्याकरिता खुपच अडचणींचा सामना करावा लागत असणे, त्याचप्रमाणे महापालिकेकडून अशा इमारतींना शास्तीची घरपट्टी लागत असल्याने रहिवाश्यांना अधिकचा भुर्दंड सोसावा लागत असून परिणामी सदरहू इमारती अनधिकृत घोषित होण्याची शक्यता निर्माण होणे, बहुतांश विकासक इमारतींचे बांधकाम नियमानुसार पूर्ण करत नसल्यामुळे देखील अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळत नसल्याची बाब समोर येणे, महापालिका क्षेत्रातील एकाच विकासकाने तसेच त्याच्या अन्य भागीदारी कंपन्यांकडून ८९ इमारतीचे बांधकाम पूर्ण करूनसुद्धा भोगवटा प्रमाणपत्र न घेतल्यामुळे अंदाजे ४५ कोटींपेक्षा अधिक रकमेचे महापालिकेचे महसूल बुडाले असल्याची बाब आढळून येणे, या इमारतींमधील रहिवाश्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच महापालिकेचा बुडालेला महसूल वसूल करण्यासाठी ज्या विकासकांनी बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींकरीता भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले नसल्यास संबंधित विकासकावर दंडात्मक कारवाई होण्याकरिता महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ मध्ये तरतूद अंतर्भूत करण्यासाठी शासनाने काही ठोस भूमिका घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(४) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अंबाजोगाई, केज शहर व परिसरातील नागरिकांना मागील १५ ते २० वर्षापासून अल्प व खंडीत पर्जन्यमानामुळे सातत्याने तीव्र पाणी टंचाईस तोंड द्यावे लागत असणे, मांजरा प्रकल्पस्थळी पाणी येण्यात तूट असल्यामुळे प्रकल्प दरवर्षी पूर्ण क्षमतेने भरत नसणे, तसेच या परिसरातील अनिश्चित पर्जन्यमानामुळे दर २ ते ३ वर्षांनी दुष्काळी परिस्थिती निर्माण होणे व पाणीपुरवठा योजनेवर गंभीर परिणाम होत असणे, सन २०१६ मध्ये भीषण परिस्थिती निर्माण होऊन मांजरा प्रकल्प पूर्णपणे कोरडा पडणे, इतर योजनेमध्येही पाणी नसल्यामुळे परिसरातील शहरी व ग्रामीण भागास पिण्याच्या पाणी पुरवठ्याकरिता सातत्याने टंचाईस तोंड द्यावे लागत असणे, तसेच जलाशयातील पाण्याच्या तुटीमुळे लाभक्षेत्रातील शेतकरी सिंचनापासून वंचीत राहत असणे, त्यामुळे टंचाईग्रस्त

अंबाजोगाई, केज शहर व ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची शाश्वत सोय उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मध्य गोदावरी खोऱ्यात अनुज्ञेय केलेल्या १९.२९ अघफू पाण्यामधून पेयजलाच्या आपुर्तीसाठी मांजरा प्रकल्पात २ ते ३ अघफू पाणी उपलब्ध करून देऊन मांजरा प्रकल्पाचे स्थैर्यिकरण या स्वतंत्र योजनेसाठी विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(५) श्री. सुहास कांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मनमाड शहराच्या मध्यवर्ती भागातून पुणे-इंदूर व नाशिक-जळगाव हे प्रमुख महामार्ग तसेच नाशिक, छत्रपती संभाजीनगर, धुळे व शिर्डीकडे जाण्यासाठी असलेले मार्ग असणे, या मार्गाच्या दोन्ही बाजूंना घनदाट वस्ती व महत्वाची शासकीय आणि व्यापारी कार्यालये तसेच शाळा, महाविद्यालये, बँका, बाजारपेठा, दवाखाने इत्यादी असणे, त्यामुळे सदर ठिकाणी नियमित वर्दळ सुरु असणे, महामार्गावर पर्यायी उड्डाणपूल उभारण्यात आलेला नसल्यामुळे दोन्ही भागांतील नागरिक व विद्यार्थ्यांना दररोज जीव मुठीत घेऊन महामार्ग ओलांडावा लागणे, तसेच महामार्गावर मोकाट जनावरे कायमच रस्ता अडवून बसलेली असल्याने वारंवार अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागणे, तसेच मनमाड शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होणे, त्यामुळे वाहनचालक, प्रवाशी यांना नाहक त्रास सहन करावा लागणे, मनमाड व नांदगाव बाह्यवळण रस्त्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे करण्यात येणे, तथापि अद्याप कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी स्थानिक नागरीकांसह प्रवाश्यांमध्ये वाढते तीव्र असंतोषाचे वातावरण, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन मनमाड येथील पुणे-इंदूर महामार्गासाठी पर्यायी उड्डाणपूल आणि बाह्यवळण रस्ता करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(६) सर्वश्री मिहीर कोटेचा, अशोक पाटील, सुनिल राऊत, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"कांजुरमार्ग - विक्रोळी कचराभूमीवर रोज ६००० टन इतका कचरा हा संपूर्ण मुंबई शहरातून कचरा व्यवस्थापन प्रक्रिया करण्यासाठी आणला जातो व त्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी M/S Anthony Lara Enviro Solution P.V.T Limited या कंपनीला सन २०११ ते २०३६ असे २५ वर्षासाठी कंत्राट देण्यात आले असणे, कंत्राटाच्या अटींप्रमाणे सर्व ऑपरेशन, मेन्टेनन्स, दुर्गंधीचे (वासाचे) व्यवस्थापन करण्यासाठी कंत्राटदाराच्या जबाबदाऱ्या असणे, तरी देखील कित्येक वर्षांपासून घाटकोपर, विक्रोळी, कांजूरमार्ग, नाहूर, भांडुप, मुलुंड या भागात राहणारे लाखो मुंबईकर यांना संध्याकाळी सहा वाजल्यापासून पहाटेपर्यंत कचराभूमी मधून येणाऱ्या दुर्गंधीचा त्रास दररोज होत असणे, तसेच पूर्ण मुंबईतून कचऱ्याची वाहतूक करणाऱ्या कचऱ्याच्या गाड्यांची दुरवस्था झाल्यामुळे कचरा बऱ्याच प्रमाणात रस्त्यावरच पडत असल्यामुळे ठीक ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरत असणे, त्यामुळे स्थानिक रहिवाश्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न

देखील निर्माण झालेला असणे, घाटकोपर, विक्रोळी, कांजूरमार्ग, नाहूर, भांडुप, मुलुंड या ठिकाणी गेल्या काही वर्षांपासून लोकवस्ती वाढल्याने तेथील कचराभूमीचा स्थानिकांना त्रास होत असल्यामुळे ही कचरा भूमी कायमस्वरूपी बंद करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केलेली असणे, सदर कचराभूमीच्या कंत्राटदाराला दिलेल्या अटींप्रमाणेच व्यवस्थापन करण्याबाबत शासनाने निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"साक्री तालुक्यातील (जि. धुळे) रा.मा. ६ ते आमोडे रस्ता इजिमा-२६ या मार्गावरील कान नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम सुरू असणे, सदर पुलाचे कार्यारंभ आदेश सानिका कन्स्ट्रक्शन यांना दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी देण्यात येणे, गेल्या अडीच वर्षापासून या पुलाचे बांधकाम अतिशय संथ गतीने सुरु असणे, सदर पुलाची पहाणी केली असता पुलाच्या दोन्ही बाजूस भिंत बांधून भराव करणे, भरावावर खडीकरण करुन डांबरीकरण करणे आणि पुलास सरंक्षण कठडे लावणे, अशी अनेक कामे अद्यापही बाकी असल्याचे दिसून येणे, ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे सदर पुलाचे काम आजपावेतो अपूर्ण असणे, त्यामुळे ८ ते १० गावातील ग्रामस्थांना दळण-वळणासाठी गैरसोयीचे होत असणे, पावसाळा सुरु झाल्याने कान नदीतून वाहतूक करणे धोकादायक ठरत असणे, ढोलीपाडा, आमोडे, झंजाळे, घोडदे, भोनगाव, दहिवेल, बोधगाव-चिंचपाडा परिसरातील नागरीकांकडून हा पुल लवकरात लवकर सुरु व्हावा अशी होत असलेली मागणी, तसेच ठेकेदाराच्या वेळकाढू धोरणासंदर्भात संबंधित विभागाने नोटीसा देखील बजावलेल्या असणे, तथापि सदर ठेकेदाराने ८० ते ९० टक्के पैसे काढून घेऊन काम बंद ठेऊन गावक-यांना वेठीस धरणे, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून संबंधीत ठेकेदारास काळ्या यादीत (ब्लॅक लिस्ट) मध्ये टाकण्याची तसेच पुलाचे काम पूर्ण करुन पूल वाहतुकीस सुरू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(८) श्री. विजयसिंह पंडित, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गेवराई (जि. बीड) तालुक्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या प्राणांतिक अपघातांमध्ये शेकडो प्रवाशांचा मृत्यू होणे, दिनांक २६ मे, २०२५ रोजी गढी उड्डाण पुलावर झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू होणे, या अपघाताच्या विश्लेषणात्मक अहवालात अनेक गंभीर त्रुटी उघडकीस येणे, मा. सर्वोच्च न्यायालयाने या अपघाताची दखल घेऊन चौकशीचे आदेश देणे, लोकप्रतिनिधींनी प्राणांतिक अपघाताच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा रस्ता सुरक्षा समितीकडे बैठक घेण्याची विनंती करणे, महामार्ग पोलीसांनी अपघात प्रवणक्षेत्राचे सर्वेक्षण करुन मागील दोन वर्षात प्राणांकित अपघातात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या आकडेवारीसह अहवाल प्रशासनास सादर करणे, वर्षानुवर्ष या अहवालाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे सुमारे ५०० हून अधिक लोकांचे बळी गेलेले असणे, महामार्गवरील उड्डाण पुल, धोकादायक मार्गाची दुरुस्ती यासह अनेक बाबी लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राव्दारे सुचवूनही संबंधितांनी याकडे अक्षम्य दुर्लक्ष करणे, सर्वोच्च न्यायालयाच्या

पत्र व्यवहारानंतर समितीचे गठन होणे, या समितीत एकही तांत्रिक अधिकारी नसणे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ व ६१ वरील अपघात स्थळांचे सर्वेक्षण करुन या बाबतच्या ठोस उपाययोजना करण्याची सर्वसामान्य जनतेकडून मागणी होणे, गेवराई विधानसभा मतदार संघातुन जाणाऱ्या महामार्गावरील प्राणांतिक अपघात रोखण्यासाठी शासनाने करावयाची ठोस उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आदिवासी विकास विभाग व नगरविकास विभाग या विभागांतर्गत दिनांक ०१ एप्रिल, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीत प्रशासकीय नियंत्रणाखालील संस्था/उपक्रमांना देण्यात आलेली कर्जे, कर्जरोखे, Letter of Comfort व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **कृषी मंत्री** : **(क)** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे व वार्षिक लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक लेखे व वार्षिक लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री अभिमन्यु पवार, सुमित वानखेडे, राजेश बकाने, राजेश वानखडे, प्रताप अडसड, प्रविण तायडे, उमेश यावलकर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री रणधीर सावरकर, रमेश कराड, किशोर जोरगेवार, राजू तोडसाम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील नागरीकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून असणे, विज्ञान युगात शेतीची मशागत ते कापणी आणि वाहतूक ही यंत्रावर अवलंबून असणे, शेतकऱ्यांना रस्त्याची नितांत आवश्यकता असणे, नकाशावरील शेतरस्ते, पांदन/पानंद रस्ते, शिवरस्ते बंद असल्याची वादावादी आणि भांडणतंटे याची प्रकरणे महसूल व गृह विभागाकडे दाखल असणे, राज्यातील ग्रामीण जिल्हा मार्ग रस्ते ग्रामविकास विभागाकडे, प्रमुख जिल्हा मार्ग व राज्य मार्ग रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग रस्ते ही राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्या अधिनस्त असणे, यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष आणि निधी शासनाकडून दिला जात असणे, शेतरस्त्यांना दर्जा आणि लेखाशिर्ष नसणे, सर्व शेतरस्ते देखभालीची जबाबदारी महसूल विभागास देण्याची व सदरील रस्ते सुधारणा आणि दुरुस्ती करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करणे आणि महसूल विभागास निधीची तरतुद करुन शेत रस्ता सुधारणा करण्याबाबत तसेच स्थानिक पातळीवर रस्ते कामासाठी स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित खातेप्रमुख यांची समिती करणे याबाबत लोकप्रतिनिधी यांची सातत्याने मागणी असणे, परंतु शासनाकडून या अत्यंत ज्वलंत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असणे, शेतरस्त्यांना दर्जा देणे आणि सर्व रस्ते महसूल विभागाकडे मालकी व देखभालीसाठी देऊन या रस्त्यांच्या सुधारणा व देखभाल दुरुस्ती कामासाठी स्वंतत्र लेखाशिर्ष तयार करुन निधीची तरतूद करण्यातबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्यात विविध धर्मांची धार्मिकस्थळे असणे, सदर धार्मिक स्थळांमध्ये लाऊड स्पिकर / भोंग्यांचा वापर होत असणे, लाऊड स्पिकर/भोंग्यांच्या आवाजामुळे ध्वनीप्रदुषण होऊन रहिवाश्यांना त्रास होणे, त्यामुळे नागरीकांनी आपल्या मुलभूत धार्मिक अधिकारांचा उपभोग घेताना अन्य नागरीकांच्या मुलभूत अधिकारांची पायपल्ली होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक असणे, तसेच पर्यावरण अधिनियम १९८६ व ध्वनी प्रदुषण नियम २००० मधील तरतुदींचे धार्मिक स्थळांकडून पालन होणे अभिप्रेत असणे, धार्मिक स्थळांच्या लाऊड स्पिकरमुळे किंवा भोंग्यांमुळे ध्वनीप्रदुषण होऊ नये म्हणून मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी विविध प्रकरणांमध्ये मार्गदर्शक तत्वे जारी केली असणे, याबाबत महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक कार्यालय यांच्याकडून दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी परिपत्रक काढलेले असणे, असे असतानाही, राज्यामध्ये विविध धार्मिक स्थळांकडून अजूनही

मोठ्या प्रमाणात लाऊड स्पिकर/ भोंग्यांचा बेकायदेशीररीत्या वापर करुन, ध्वनीप्रदुषण करणे सुरु असणे, त्यामुळे शासनाकडून प्रभावी उपाययोजना जसे की, पोलीस स्टेशन अंतर्गत भरारी पथकांची नेमणूक करणे, अधिका-यांनी तक्रारीची वाट न पाहता स्वत:हून (सुओ मोटो) कारवाई करणे, यासंदर्भात उत्तरप्रदेश राज्याच्या प्रभावी धोरणाप्रमाणे महाराष्ट्र राज्यात धोरण राबविणे, शासनाचे विविध विभाग जसे की, पर्यावरण, गृह, नगरविकास, महसूल, इत्यादी विभागांच्या समन्वयातून शासनस्तरावरुन व्यापक व परिपूर्ण सूचना निर्गमित करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. गोपिचंद पडळकर, देवेंद्र कोठे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. राहूल आवाडे, अनुप अग्रवाल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सांगली जिल्ह्यातील ऋतुजा चंद्रकांत पाटील (राजगे) या गरोदर महिलेने धर्मांतरासाठी सक्ती केल्याने आत्महत्या केलेली असणे, पुणे जिल्ह्यातील पंडिता रमाबाई मुक्ती मिशन या संस्थेच्या अनाथ आश्रमामध्ये मुलींचे बळजबरीने धर्मांतरण होत असल्याने फौजदारी गुन्हा दाखल झालेला असणे, सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यामध्ये महादेव टकले या व्यक्तीने मुस्लिम व्यक्तींकडून धर्मांतरण करण्यासाठी त्याच्यावर बळजबरी होत असल्याबाबतची तक्रार दाखल केलेली असणे, तसेच हिंदू धर्मीय मुली व महिलांचे लैंगिक शोषण करुन त्यांना धर्मांतरणासाठी प्रवृत्त केले जात असल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात उघडकीस आलेल्या असणे, महाराष्ट्रात अशा प्रकारच्या अवैध धर्मांतरणासाठी अनेक ख्रिश्चन व मुस्लिम धार्मिक संस्था व व्यक्ती कार्यरत असणे, लव्ह जिहाद व बलपूर्वक केलेले धर्मांतरण रोखण्याच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींच्या अभ्यासासाठी शासनामार्फत दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी समितीची स्थापन झालेली असणे, समितीचा अहवाल गृह-विभागाला प्राप्त झालेला असणे, संपूर्ण महाराष्ट्रभर अशा धर्मांतरणाच्या गंभीर घटना घडत असतानाही बलपूर्वक होणारे धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा तयार करण्याबाबत शासनाकडून टाळाटाळ होत असणे, त्यामुळे शासनामार्फत कालमर्यादित धर्मांतरण रोखण्याबाबतचा कायदा तयार करणे, सदर कायद्यामध्ये अवैधरित्या व अनधिकृतपणे धर्मांतरण करणाऱ्यांच्या मिळकतीवर जप्ती आणण्याची तरतूद करणे, धर्मांतरण करुनही आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या व्यक्तींना कायदेशीर शास्ती करणे, तसेच धर्मांतरणासाठी प्रवृत्त करणाऱ्या व्यक्ती, संस्था व धर्मगुरु यांना सहआरोपी घोषित करणेबाबत शासनाची भुमिका व आवश्यक उपाययोजना."

**(४) सर्वश्री विठ्ठल लंघे, सुधीर मुनगंटीवार, हेमंत ओगले, सुरेश धस, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील अहिल्यानगर जिल्ह्यातील शनि शिंगणापूर हे देवस्थान महाराष्ट्रातील एक प्रमुख असे तीर्थक्षेत्र असणे, सध्या कार्यरत असलेल्या विश्वस्त मंडळाद्वारे देवस्थानच्या कारभारामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असणे, तसेच काही

महिन्यांपूर्वी शनि शिंगणापूर विश्वस्त मंडळातील सदस्यांकडून बनावट ॲप तयार करून दोन लाखांच्यावर भाविकांकडून १ हजार ८०० रुपये याप्रमाणे बनावट ॲप नावाखाली ३६ कोटींच्या वर आर्थिक फसवणूक करून मोठ्या प्रमाणात घोटाळा केल्याची बाब माहे जून २०२५ या महिन्यामध्ये उघडकीस आली असणे, या बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबई शहर हे सुनियोजित शहर म्हणून नावारूपास आले असून त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य हे ऐतिहासिक, धार्मिक, भौगोलिक व वैद्यकीय पर्यटनासाठी प्रसिद्ध असणे, यातील धार्मिक प्रार्थनास्थळांबाबत व त्यांच्या नियमितीकरणाबाबत राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार प्रत्येक धार्मिक स्थळांच्या संस्थांना बोलाऊन प्रथम त्यांचे म्हणणे ऐकणे अपेक्षित असणे, मात्र असे होत नसल्याचे दिसून येत असणे, नवी मुंबईत हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, जैन आदी सर्वधर्मीय बांधवांची प्रार्थनास्थळे असणे, तसेच नवी मुंबईतील सर्व धर्मीय प्रार्थनास्थळांना नवी मुंबई महानगरपालिका व सिडको मार्फत नोटीसा बजावून तोडक कारवाई करणे, शासन नियमानुसार अ, ब आणि क अशी धार्मिक स्थळांची वर्गवारी महापालिकास्तरीय समितीने करणे गरजेचे असणे, तसेच कोणती धार्मिक स्थळे नियमित होऊ शकतात, कोणती धार्मिक स्थळे नियमित होऊ शकत नाहीत, कोणती धार्मिक स्थळे स्थलांतरित होऊ शकतात त्यांचा समावेश या वर्गवारीत करणे, कारवाई करण्यापूर्वी प्रत्येक धार्मिक स्थळांच्या संस्थांना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेणे, धार्मिक स्थळांच्या संस्थांचे म्हणणे ऐकून न घेता एकतर्फी कारवाई करणे, तसेच नवी मुंबईतील सर्व धार्मिक स्थळांचा सर्व्हे करून ५०० मीटरच्या सर्व धर्मीय प्रार्थना स्थळांना सामाजिक दर लावून नियमित करणे, तसेच नवी मुंबईतील धार्मिक स्थळांसंदर्भात नवीन धोरण ठरवून जेवढे लहान भूखंड आहेत ते धार्मिक स्थळांसाठी आरक्षित ठेवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, अस्लम शेख, साजिद खान पठाण, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री संजय मेश्राम, राजकुमार बडोले, विकास ठाकरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विदर्भातील सहा जिल्ह्यातील झुडपी जंगलांना वनक्षेत्र घोषित करुन ८६ हजार हेक्टर क्षेत्र महसूल विभागाने वन विभागाला हस्तांतरीत करण्यात येणार असल्याची बाब माहे जून, २०२५ च्या दरम्यान उघडकीस येणे, यामुळे या जमिनीला डिनोटीफाय करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाला मोठा धक्का बसणे, या निर्णयामुळे पूर्व विदर्भातील लाखो कुटूंबे बेघर आणि भूमीहिन होण्याचा धोका निर्माण होणे, नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये विकासकामे आणि प्रकल्प उभारणे अशक्यप्राय होणार असून उद्योग धंदे नसल्याने स्थानिक तरुण रोजगारापासून वंचित होण्याची निर्माण झालेली भिती, त्यामुळे स्थानिक जनतेत

पसरलेली तीव्र नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुर्नविचार याचिका दाखल करुन सहारिया कमिटीने दिलेल्या अहवालाप्रमाणे राज्य शासनाची बाजू भक्कमपणे मांडून करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"व्हिलेज माजिवडे ता.ठाणे सर्वे न.१२/१, ते ४, व इतर सर्वे न.४९/१, २, ३, ५०/१, २, ३, ४, ५१/५ पार्ट आणि ३८६/३, ४२३/१, क, इ, ग, ३४५/३, ४, ८ या भूखंडावरील कांदळवन -तिवरे नष्ट करून विकासक मे.केपटाऊन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. व वास्तुविशारद यांनी रुस्तमजी अर्बेनिया येथे अनेक इमारतींचे बांधकाम केलेले असणे. याबाबत २०/०१/२०२२ व ०२/०/२०२३ रोजी केंद्र सरकारच्या पी जी पोर्टल व राज्य सरकारच्या आपले सरकार पोर्टलवर पर्यावरणप्रेमी राजेश दाभोळकर यांनी तक्रार करूनही सदर अनधिकृत बांधकामावर कोणतीच कारवाई न होणे, कांदळवन नष्ट केल्याची कोणतीही तक्रार ज्यावेळी येते त्यावेळेस, जिल्हाधिकारी, वनअधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या उपस्थितीत संयुक्त पाहणी करणे बंधनकारक असताना तसे झालेले नसणे, हे पर्यावरण कायदा १९८६ चे उल्लंघन असणे, ३-४ इमारतींपेक्षा जास्त बांधकाम केलेले असतानाही स्थानिक नागरिक सदर इमारतींमध्ये राहायला गेलेले असतानाही अद्यापही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कन्सेंट टू ऑपरेटची परवानगी घेतलेली नसणे, तसेच सदर भूखंडाच्या समोरही माजिवडे साकेत रोड समोरही गार्डनच्या समोरील भूखंडावरील कांदळवन नष्ट करून बांधकामास परवानगी दिल्याचे निदर्शनास येणे, पोल्यूटर्स पे प्रिन्सिपल या तत्वानुसार विकासकाकडून अद्यापही ५ टक्के दंड रक्कम शासनाकडे जमा न करण्यात येणे, स्थानिक तहसीलदार, वन अधिकारी, प्रांत अधिकारी यांनी विकासकाबरोबर संगनमत करून कांदळवनाचा ऱ्हास केल्यानंतरही कोणतीच कारवाई न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(८) श्री. राजु तोडसाम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील अनेक गावांमध्ये मनरेगा अंतर्गत मजूरांच्या नावे असलेल्या बँक खात्यांमध्ये अचानक १०० कोटींपेक्षा अधिक रक्कम जमा झाली असणे, परंतु, या खात्यांतील मजूर हे प्रत्यक्षात बेरोजगार, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असून त्यांना ही रक्कम का व कशासाठी आली याबाबत कोणतीही माहिती नसणे, आणि परस्पर खातेदार व्यक्तींच्या खात्यांमधून ऑनलाईन पद्धतीने काढण्यात पण आली असणे, या रकमेचा वापर काही संशयास्पद व्यक्तींनी काळा पैसा पांढरा करण्यासाठी केल्याचा संशय असणे, स्थानिक पोलीस आणि बँक अधिकारी यांच्या माध्यमातून याप्रकरणी चौकशी सुरू झाली असून, अनेक मजुरांनी फसवणूक झाल्याच्या तक्रारी दिल्या असणे, या घोटाळ्यात बँकेतील कर्मचाऱ्यांची भूमिका,

शासनाच्या योजनांमधील यंत्रणांची लाचारी आणि आर्थिक फसवणुकीचा मोठा कट असल्याचे दिसून येणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी सीबीआय / ईडीमार्फत करण्याची होत असलेली मागणी, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : (गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दिपक केसरकर, सुरेश धस, धनंजय मुंडे, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजय बनसोडे, राजेंद्र गावित, संभाजी निलंगेकर-पाटील, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री चेतन तुपे, नारायण कुचे, शांताराम मोरे, शेखर निकम, बबनराव लोणीकर, किशोर पाटील, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, निलेश राणे, महेश शिंदे, गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, चंद्रदिप नरके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री संजय गायकवाड, राजकुमार बडोले, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत सोनवणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, मंजुळा गावित, श्री. प्रताप पाटील-चिखलीकर, डॉ. संजय कुटे, श्री. राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिष पिंपळे, महेंद्र थोरवे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री प्रवीण दटके, किरण सामंत, दिलीप बनकर, देवराव भोंगळे, संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, डॉ. किरण लहामटे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विलास तरे, हिरामण खोसकर, रमेश कराड, अमोल पाटील, चंद्रकांत नवघरे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुहास कांदे, अमोल खताळ, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री विठ्ठल लंघे, राजेश पवार, बाबुराव कदम-कोहळीकर, आनंद तिडके, राणाजगजितसिंह पाटील, हिकमत उढाण, राजेंद्र यड्रावकर-पाटील, विक्रम पाचपुते, राजेश मोरे, विजय शिवतारे, ॲड. राहुल कुल, डॉ.तानाजी सावंत, श्री. सुहास बाबर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, शंकर मांडेकर, सुभाष देशमुख, अनुपभैय्या अग्रवाल, काशिराम पावरा, विजय देशमुख, दिलीप बोरसे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री महेश लांडगे, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजू तोडसाम, समीर कुणावार, राजेश वानखडे, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, आमश्या पाडवी, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री शरद सोनवणे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, कृष्णा खोपडे, किर्तीकुमार भांगडिया, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, करण देवतळे, चरणसिंग ठाकूर, सुधीर गाडगीळ, अमल महाडिक, हेमंत रासने, सुनिल कांबळे, मनोज घोरपडे, सचिन कल्याण-शेट्टी, शंकर जगताप, राजेश पाडवी, डॉ. आशिष देशमुख, श्री. राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री चैनसुख संचेती, केवलराम काळे, संजय पुराम, समीर मेघे, संतोष दानवे, भिमराव तापकीर, भिमराव केराम, अमोल जावळे, रत्नाकर गुट्टे, सिद्धार्थ शिरोळे,**

**राहुल आवाडे, देवेंद्र कोठे, डॉ. विजयकुमार गावित, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री मोहन मते, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन राज्यात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्हयातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्टयातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रिमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इ. धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पद्धतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, 'मॅगनेट २.०' अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करून देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**सहा : (गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री अजय चौधरी, रोहित पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, सर्वश्री अमीन पटेल, दिलीप सोपल, रोहित पवार, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री उत्तमराव जानकर, अस्लम शेख, कैलास घाडगे-पाटील, संदिप क्षिरसागर, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री सुनिल राऊत, बापूसाहेब पठारे, अमित झनक, संजय पोतनीस, नारायण पाटील, विकास ठाकरे, नितीन देशमुख, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, राजु खरे, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"मागील काही वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न झाल्याने या संस्थांवर प्रशासकाचे नियंत्रण असणे, त्यामुळे राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती या अंतर्गत येणाऱ्या शहरी भागात पायाभुत सुविधांचा बोजवारा उडाला असणे, लोकप्रतिनिधींचा वचक नसल्यामुळे मनमानीपणे कारभार सुरु असणे, त्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याची प्रकरणे उघडकीस येणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य मोबदला मिळत नसल्याने विकासाची अनेक कामे रखडलेली असणे, रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात निविदांची रक्कम वाढविल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार होऊन सदरची कामे निकृष्ट दर्जाची झाली असणे, शहरी भागात प्रदुषणाने विळखा घातला असून धुळीचे साम्राज्य, कचऱ्याचे ढिग, नविन बांधकामे होत असताना त्यातून निघणारे डेब्रिज, प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर त्यामुळे शहरी भागात पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, शहरी भागात डंपिंग ग्राऊंडमुळे निर्माण झालेला प्रश्न, डंपिंग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध नसणे, झोपडपट्टयांचा पुनर्विकास करण्यास होत असलेला विलंब, जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत रखडलेली प्रकरणे, पावसाळ्यापुर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयातील रिक्त पदांमुळे व अद्ययावत उपकरणांअभावी रुग्णांना उपचार देण्यात येणाऱ्या अडचणी, स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत शासनाने दाखविलेल्या उदासिनतेमुळे अनेक प्रकल्प रखडलेले असणे, मुंबई महापालिकेच्या के/पश्चिम वॉर्डातील जुहूतारा रोड येथील "सो हो हाऊस" या पंचतारांकित हॉटेलचे बांधकाम करतांना कोस्टल रेग्युलेशनचे झालेले उल्लंघन, २ चटईक्षेत्र निर्देशांक मिळत असतांना २.५ जास्त चटई क्षेत्र देऊन दिलेले भोगवटा प्रमाणपत्र, सदर हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात झालेले अनधिकृत बांधकाम, स्थानिक नगरसेवकांनी महानगरपालिकेकडे केलेल्या तक्रारी, माजिवडे (जि. ठाणे) येथील कांदळवन-तिवरे नष्ट करुन रुस्तमजी अर्बेनिया या इमारतीचे झालेले बांधकाम, पर्यावरण कायद्यांचे झालेले उल्लंघन, या इमारतींसमोर अशाच प्रकारचे झालेले अनधिकृत बांधकाम, मुंबईतील वांद्रे (पूर्व) विभागातील रखडलेले पुनर्विकास प्रकल्प, परभणी नगरविकास विभागाच्या अमृत-२ अभियान योजनेंतर्गत येलदरी समांतर पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना,

डंपिंग ग्राउंड, डिगी नाला खोलीकरण व रुंदीकरण, भिमनगर येथील अंडरपास रस्ता आणि महापालिका क्षेत्रात नवीन नाट्यगृह बांधणे या विकास कामांच्या प्रस्तावास जुलै, २०२२ ते जानेवारी, २०२३ दरम्यान राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने दिलेली मान्यता, सदर प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेसाठी नगरविकास विभागाकडे प्रलंबित असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप उपरोक्त विकास कामांना उपलब्ध न झालेला निधी, निधीअभावी गेल्या २-३ वर्षांपासून सदर योजनांची रखडलेली कामे, ठाणे शहरातील नागरिकांनी क्लस्टर योजनांना केलेला तीव्र विरोध, विरोध डावलून नागरिकांच्या घरांवर त्यांना सुचना न देता नोंदणी क्रमांक टाकण्यात येणे. ठाणे जिल्हा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचा उडलेला बोजवारा, या योजनेत झालेली अनियमितता व भ्रष्टाचार, ठाणे म.न.पा. आणि महसूल विभागात झालेला भ्रष्टाचार, पुणे जिल्ह्यात विविध प्रकल्पांच्या पुनर्वसनाच्या भुखंड वाटपात झालेला भ्रष्टाचार, राज्यातील देवस्थान इनाम जमिनींची परस्पर विक्री करुन झालेला भ्रष्टाचार, विविध महसूल कायद्यांमध्ये आवश्यक असलेल्या कालबध्द सुधारणा, नामदेववाडी को-ऑप. सोसायटी, फॉरजेट स्ट्रीट, मुंबई या सोसायटीचा मागील १५ वर्षांपासून रखडलेला पुनर्विकास, बांधकाम कामगार मंडळातील विविध वस्तु वाटपात झालेला भ्रष्टाचार तसेच मंडळाच्या सचिवाची नियमबाह्य केलेली पुनर्नियुक्ती, कोकणातील विकास कामांसाठी गेल्या ३ वर्षापासून न देण्यात आलेला निधी, कोकणात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्लॅनला गेल्या दोन वर्षात न देण्यात आलेली मंजुरी, पावसामुळे नादुरुस्त झालेल्या कोकणातील साकव तसेच पुलांची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता, तसेच शाळा इमारती, अंगणवाडी इमारती, ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींसाठी निधी मंजूर करण्याची आवश्यकता, अतिवृष्टीमुळे कोकणात रस्ते खराब होण्याचे प्रमाण अधिक असल्याने रस्त्यांसाठी विशेष निधीची आवश्यकता, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे अत्यंत धिम्या गतीने सुरु असलेले काम, मे, २०२५ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे सदर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे व त्यामुळे वाढलेले अपघाताचे प्रमाण, राज्यातील तिर्थक्षेत्रांना जोडणारा "'शक्तीपीठ महामार्ग" बांधण्याची शासनाची योजना, राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणारा सदर महामार्ग, तिर्थक्षेत्रांकडे जाण्यासाठी अगोदरच असलेले रस्त्यांचे जाळे, सदर महामार्गाला राज्यातील जनतेचा असलेला विरोध, तसेच गेल्या काळात राज्याच्या आरोग्य खात्यातील आणखी एक गंभीर प्रकरण उघडकीस येणे, लसींच्या साठवणुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या कोल्ड चेन उपकरणांच्या तब्बल ६२ कोटींच्या टेंडर प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून येणे, खुल्या बाजारातील किंमतीच्या चार ते पाचपट दरात खरेदी करुन अधिकारी आणि ठेकेदारांनी सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणे, सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी काढलेल्या RT १४५ क्रमांकाच्या ५६ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेत मोठी अनियमितता आणि संगनमत असणे, आवश्यक वैद्यकीय उपकरणे आणि साहित्याच्या खरेदीत झालेला घोटाळा, जीईएम पोर्टलवर या यंत्राची किंमत सुमारे ४ लाख ४८ हजार रुपये इतकी असणे, हेच यंत्र आरोग्य विभागाने प्रत्येकी सुमारे ६ लाख १० हजार रुपये दराने खरेदी करणे, आरोग्य विभागातील जिल्हा आरोग्य अधिकारी आणि खनिकर्म विभागातील जिल्हा खनिकर्म अधिकारी व ठेकेदार संस्थेने संगनमताने कुठलीही विहित खरेदी प्रक्रिया राबविली नसल्याचे दिसून येत असून यंत्रसामुग्रीची बाजारातील किंमतीची शहानिशा

न करता अधिकच्या दराने खरेदी करण्यात येणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पदभरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थींना शुल्क भरण्यात अडचणी येणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामांसाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## अशासकीय कामकाज

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**सात : अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.रोहित पवार, वि.स.स. यांचे**

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५७ - महाराष्ट्र धर्मगुरु, ऐतिहासिक महापुरुष आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्वांचा अपमान (प्रतिबंध आणि शिक्षा) विधेयक, २०२५ - **श्री.रईस शेख, वि.स.स. यांचे**

**(३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२५- **श्री.अजय चौधरी, वि.स.स. यांचे**

**(४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७२ - महाराष्ट्र राज्यातील ज्येष्ठ नागरिक (सेवा, सुविधा इत्यादी देण्याबाबत) विधेयक, २०२५ - **डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे**

**(ब) विचारार्थ :-**

**(गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अशासकीय विधेयके) (क्रमांक १ ते ४)**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२५ - **सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेली अशासकीय विधेयके) (क्रमांक ५ ते ८)**

**(५)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ – **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(६)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांचे**

**(७)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(८)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०२५ - **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १० जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.